प्रकरण : ४

सांगोला तालुक्यातील रोजगार हमी योजना

प्रकरण : ४

सांगोला तालुक्यातील रोजगार हमी योजना

प्रस्तावना :-

सोलापूर जिल्ह्यातील सांगोला हा अवर्षणप्रवण दुष्काळी तालुका म्हणून ओळखला जातो. सांगोला तालुक्यातील बहुसंख्य शेती कोरडवाहू असून पाटबंधाऱ्यांच्या कामाचे प्रमाण कमी आहे. उद्योगधंदे नसल्यामुळे शेतीवर अवलंबून असणाऱ्या लोकांचे प्रमाण जास्त आहे. जमिनीची उत्पादकता कमी असल्यामुळे या तालुक्यात रोजगार हमी योजनेची कामे मोठ्या प्रमाणात घेतली जातात. कारण शेतमजूर व छोट्या सीमांत शेतकऱ्यांना खरीप पिके घेतल्यानंतर रोजगार हमी योजनेच्या कामावर खात्रीचा रोजगार मिळतो. सांगोला तालुक्यातील रोजगार हमी योजनेचा अभ्यास करण्यासाठी लोटेवाडी, कटफळ आणि इटकी या तीन गावांची निवड करण्यात आली असून या तीन गावातील रोजगार हमी योजनेची अमंलबजावणीसंबंधी मुलाखत व निरीक्षण या पध्दतीचा अवलंब केला. रोहयो अभ्यासाठी या गावातील १०० शेतमजूरांच्या मुलाखती, १५ शेतकऱ्यांच्या व या गावातील सरपंच यांचा प्रश्नावलीच्या आधारे मुलाखती घेवून तेथील निरीक्षणावरून रोहयोचा अभ्यास केला. तसेच सांगोला तालुक्यातील प्रशासकीय रोहयो अमंलबजावणी अधिकारी यांची मते यासंबंधी जाणून घेतली आहेत.

सांगोला तालुक्यातील रोजगार हमी योजनेच्या कामाचे स्वरूप :-

सांगोला तालुक्यात ज्यांना कामाची गरज आहे व शारीरीक श्रमाचे करण्याची तयारी आहे अशा सर्व अकुशल लोकांना रोजगार हमी योजनेवर काम देवून अनेक उत्पादक कामे राबविण्यात आली आहेत.

१) **जलसंधारण व मृदसंधारणाची कामे :-**

यामध्ये पाझर तलाव, गाव तलाव, कंटुरबंडिंग, नालाबंडिंग, बंधारे, बांध, रस्ते इ. भूविकसाची कामे राबविण्यात आली.

२) **वनीकरण व सामाजिक वनीकरण**

३) **कृषीविषयक कामे :-**

फळबाग विकास लागवड, शेततळी, जवाहर विहिरी इ.

रोजगार हमी योजनेखाली सांगोला तालुक्यात खालील प्रकारची कामे राबविण्यात आली

१) **लोटेवाडी** गावांमध्ये २००१ ते २००६ या पाच वर्षाच्या कालावधीमध्ये रोहयोची झालेली विकास कामे, वार्षीक प्रतिदिन सरासरी मजूर उपस्थिती.

कोष्टक क्र. ४.१

अ. क्र.	वर्ष	रोहयोची झालेली विकास कामे	वार्षिक प्रतिदिन सरासरी मजूर उपस्थिती
१.	२००१-२००२	नालाबंडिंग - २ पाझर तलाव - १	४०
२.	२००२-२००३	शेततळी - ५ सामाजीक वनीकरण - १ कटुंर बंडिंग - २०	४५
३.	२००३-२००४	फळबाग लागवड - १५ एकर गावतलाव - १ जवाहर विहिरी - ५ सामाजिक वनीकरण - १	६०
४.	२००४-२००५	शेततळी - १० नालाबंडिंग - २ ओढ्यावरील बंधारे - १२	३५
५.	२००५-२००६	कंटुर बंडिंग - २५ शेततळी - ५	२०

कोष्टक क्रं. ४.१ नुसार, लोटेवाडी गावामध्ये २००१ ते २००६ या पाच वर्षाच्या कालावधीमध्ये रोहयोची नालाबंडिंग, पाझर तलाव, शेततळी, सामाजिक वनीकरण, फळबाग लागवड, ओढ्यावरील बंधारे,

कंटुरबंडिंग इ. स्वरूपाची कामे राबविण्यात आली आहेत. या पाच वर्षामध्ये रोहयो कामावरील मजुरांची उपस्थिती सरासरी ४० दिसून येते. २००३-२००४ या वर्षी लोटेवाडी गावामध्ये दुष्काळ पडला असल्यामुळे या वर्षी शेतकरी, शेतमजूरांना शेतामध्ये कामे मिळाली नसल्यामुळे शेतकरी, शेतमजूर यांची रोहयो कामाची उपस्थिती ही इतर वर्षापेक्षा अधिक दिसून येते.

२) **कटफळ** गावांमध्ये २००१ ते २००६ या पाच वर्षांच्या कालावधीमध्ये रोहयोची झालेली विकास कामे, वार्षीक प्रतिदिन सरासरी मजूर उपस्थिती.

कोष्टक क्र. ४.२

अ. क्र.	वर्ष	रोहयोची झालेली विकास कामे	वार्षिक प्रतिदिन सरासरी मजूर उपस्थिती
१.	२००१-२००२	जवाहर विहिरी - २ पाझर तलाव - १	२५
२.	२००२-२००३	नालाबंडिंग - १ गाव तलाव - १	३५
३.	२००३-२००४	नाला बंडिंग - २ कंटुर बंडिंग - २५ शेततळी - ६० सामाजीक वनीकरण - १ गाव तलावातील गाळ काढणे - १	६५
४.	२००४-२००५	ओढ्यावरील बंधारे - ५ शेततळी - १०	२०
५.	२००५-२००६	नालाबंडिंग - १ पाझर तलाव - १	३०

कटफळ या गावामध्ये २००१ ते २००६ या पाच वर्षांच्या कालावधीमध्ये पाझर तलाव, जवाहर

विहिरी, नालाबंडिंग, गाव तलाव, कंटुर बंडिंग, शेततळी, सामाजीक वनीकरण, ओढ्यावरील बंधारे, पाझर तलाव, गाव तलावातील गाळ काढणे इ. स्वरूपाची रोहयो कामे राबविण्यात आली. कटफळ गावामध्ये या पाच वर्षीच्या कालावधीमध्ये सरासरी वार्षिक मजुरांची उपस्थिती सुमारे २१ दिसून येते. २००३-२००४ या वर्षी कटफळ गावात दुष्काळ पडला असल्यामुळे छोटे शेतकरी व शेतमजुरांना रोहयोच्या कामावर जाण्याची गरज निर्माण झाली. त्यामुळे त्यावर्षी रोहयोच्या कामाची मागणी वाढलेली दिसते. मजूरांची रोहयो कामावरील उपस्थिती या वर्षी जास्त दिसून येते.

३) इटकी गावांमध्ये २००१ ते २००६ या कालावधीत रोहयोची झालेली विकास कामे, मजुरांची सरासरी उपस्थिती.

कोष्टक क्र. ४.३

अ. क्र.	वर्ष	रोहयोची झालेली विकास कामे	वार्षिक प्रतिदिन सरासरी मजूर उपस्थिती
१.	२००१-२००२	सामाजिक वनीकरण - १ शेततळी - १०	२०
२.	२००२-२००३	जवाहर विहिरी - २ शेततळी - १० नालाबंडिंग - २	४०
३.	२००३-२००४	शेततळी - ५० पाझर तलाव - २ बंधारे - ४ पाझर तलावातील गाळ काढणे - २	६०
४.	२००४-२००५	फळबाग विकास लागवड - ५ एकर कंटुर बंडिंग - १० शेततळी - ५	३०

UNIVERSITY, KOLHAPUR

५.	२००५-२००६	शेततळी - २ नाला बंडिंग - १ कंटुर बंडिंग - १५	२५

वरील कोष्टक क्रं. ४.३ नुसार इटकी या गावामध्ये २००१ ते २००६ या पाच वर्षाच्या कालावधीमध्ये सामाजिक वनीकरण, जवाहर विहिरी, शेततळी, नालाबंडिंग, बंधारे, पाझर तलावातील गाळ काढणे इ. कामे राबविली आहेत. या पाच वर्षात सरासरी मजुरांची उपस्थिती ही सुमारे ३५ दिसून येते. २००३-२००४ या वर्षी दुष्काळी परिस्थितीमुळे रोहयोच्या कामाची मागणी वाढलेली दिसून येते. या वर्षी शेतकरी, शेतमजूरांना शेतामध्ये कामे नसल्यामुळे रोहयोच्या कामांची संख्या, मजुरांची उपस्थिती जास्त दिसून येते.

सांगोला तालुक्यातील लोटेवाडी, कटफळ, इटकी या गावांतील १०० शेतमजुरांचा मुलाखती, निरीक्षणावरून केलेला अभ्यास

कोष्टक क्र. ४.४

गावाचे नाव	पुरुष	स्त्रिया	एकूण
लोटेवाडी	३०	२०	५०
कटफळ	२०	१५	३५
इटकी	४०	२५	६५
	९०	६०	१००

वरील कोष्टक क्रं. ४.४ नुसार लोटेवाडी, कटफळ आणि इटकी या गावामध्ये सुमारे ९० पुरुष, सुमारे ६० स्त्री रोहयोच्या कामावर काम करीत होते. एकूण १५० रोहयो मजूर काम करीत होते. यामध्ये इटकी या गावांत इतर दोन गावांपेक्षा रोहयो मजूरांची संख्या जास्त दिसून येते. १५० रोहयो मजूरांपैकी १०० रोहयो मजुरांच्या मुलाखती घेवून रोहयोच्या कामाची माहिती प्रश्नावलीच्या आधारे घेण्यात आली. त्यामध्ये ६० पुरुष मजुरांचा समावेश असून, ४० स्त्री मजूर आहेत. या तीन गावांत शेततळी, नालाबंडिंग, कंटुर बंडिंग, पाझर तलाव यांची कामे चालू होती.

१०० शेतमजुरांचे वयोगटानुसार वर्गीकरण

कोष्टक क्र. ४.५

वय / वर्षे	शेतमजुरांची संख्या	शेकडा प्रमाण
१५ ते २०	१	१
२१ ते ३०	१४	१४
३१ ते ४०	२१	२१
४१ ते ५०	३९	३९
५१ ते ६०	२०	२०
६० पेक्षा जास्त	५	५
एकूण	१००	१००

कोष्टक क्रं. ४.५ नुसार लोटेवाडी, कटफळ आणि इटकी या गावांमधील १०० शेतमजूरांचे वयोगटानुसार वर्गीकरण केले आहे. ३९ % शेतमजूर ४१ ते ५० या वयोगटातील मोडतात. याचा अर्थ हे शेतमजूर प्रौढ व रोहयोच्या कामाचा दीर्घ अनुभव असलेले आहेत. १५ ते २० या वयोगटातील शेतमजूरांचे प्रमाण केवळ १ % आहे. २१ ते ३० या वयोगटातील प्रमाण शेकडा १४ % आहे. याचा अर्थ असा की प्रौढ व अनुभवी शेतमजूरच या कामावर येतात.

सर्वसाधारणपणे २० ते ४० वयोगटातील व्यक्ती तरूण समजले जातात. ५० ते ६० या वयोगटातील प्रमाण २० % आहे. ६० पेक्षा जास्त वय असणारे ५% वयोवृध्द शेतमजूर आहेत. एकूण शेतमजूरांपैकी ९६% विवाहीत शेतमजूर असून केवळ ४ % शेतमजूर अविवाहित आहेत.

शेतमजूरांचे शिक्षणानुसार वर्गीकरण

कोष्टक क्र. ४.६

शिक्षण	शेतमजूरांची संख्या	शेकडा प्रमाण
प्राथमिक शिक्षण	१८	१८
माध्यमिक शिक्षण	२	२
निरक्षर	८०	८०
	१००	१००

कोष्टक क्रं. ४.६ नुसार यामध्ये शेकडा १८% शेतमजूरांचे प्राथमिक शिक्षण झालेले आहे. तर केवळ माध्यमिक शिक्षण घेतलेले केवळ २% शेतमजूर आहेत. निरक्षर असलेल्या शेतमजुरांचे प्रमाण हे जास्त असून ते शेकडा ८०% आहे. यावरून असे दिसते की, रोहयोच्या कामावर निरक्षरांचे प्रमाण अधिक दिसून येते. त्यामुळे रोहयोच्या नियमांची शेतमजुरांना माहिती नसते.

शेतमजूरांचे जातीनुसार वर्गीकरण

कोष्टक क्र. ४.७

जात	एकूण	शेकडा प्रमाण
धनगर	७०	७०
मराठा	१०	१०
महार	१०	१०
मांग	२	२
कुंभार	२	२
यलमार	४	४
कैकाडी	२	२
	१००	१००

वरील कोष्टक क्रं. ४.७ नुसार शेतमजुरांपैकी शेकडा ७०% धनगर समाजातील असून शेतमजूरांपैकी या समाजाचे शेतमजूर जास्त आहेत. कारण या भागात या समाजाची संख्या जास्त आहे. वरील वर्गीकरण १०० शेतमजूरांपैकी आहे. मराठा जातीचे शेकडा १०% शेतमजूर आहेत. महार जातीचे १०% शेतमजूर आहेत. मांग, कुंभार, कैकाडी या जातींची संख्या २% आहे. यलमार जातीचे ४% शेतमजूर आहेत.

शेतमजूरांचे व्यवसायानुसार केलेले वर्गीकरण

कोष्टक क्र. ४.८

व्यवसाय	शेतमजूरांची संख्या	शेकडा प्रमाण
शेती असेलेले व सीमांत शेतकरी	३०	३०
भूमीहिन	४०	४०
पारंपारीक व्यवसाय करणारे	२०	२०
पशुपालन करणारे शेतकरी, शेतमजूर, ऊसतोडणी कामगार	१०	१०
	१००	१००

वरील १०० शेतमजूरांपैकी शेकडा ४०% शेतमजूरांना जमीन नाही. त्यामुळे त्यांना शेतमजुरीवरतीच जीवन जगावे लागते. शेती असलेले सीमांत शेतकरी शेकडा ३०% शेतमजूर असून त्यांच्या शेतीला पाणी नाही. दुष्काळी परिस्थितीमुळे सीमांत शेतकरी सुध्दा या योजनेवर काम करतात. पारंपारीक व्यवसाय करणारे परंतु ते व्यवसाय आता मोडकळीस आल्यामुळे शेतमजूरी करणाऱ्या मजूरांची संख्या शेकडा २०% आहे. आर्थीक परिस्थितीमुळे पशुपालन करणारे शेतकरी, शेतमजूर, ऊसतोडणी कामगार यांची संख्या १०% आहे.

शेतजमीन असलेल्या छोटे शेतकरी, शेतमजूरांचे वर्गीकरण

कोष्टक क्र. ४.९

शेतजमिनीचे क्षेत्र	शेतमजूरांची संख्या
१ ते ३ एकर पेक्षा कमी	२०
३ ते ५ एकर	१५

५ ते ९ एकर	७
९ ते १० एकर	५
११ एकर पेक्षा अधिक	३
	५०

वरील कोष्टक क्रं. ४.९ नुसार छोटे शेतकरी व शेतमजूरांची एकूण संख्या ५० दिसून येते. १ ते ३ एकर पेक्षा कमी शेतजमीन असणाऱ्या छोटे शेतकरी, शेतमजूरांची संख्या जास्त दिसून येते. ११ एकर शेतजमीन असणाऱ्या शेतमजूरांची संख्या सर्वात कमी आहे. ३ ते ५ एकरच्या दरम्यान शेतजमीन असणाऱ्या शेतमजूरांची संख्या १५ आहे. ५ ते ९ एकरच्या दरम्यान जमीन असणाऱ्या शेतमजूरांची संख्या ७ आहे. यावरून असे लक्षात येते की, रोहयो कामावरील काम करणाऱ्या छोटे शेतकरी, शेतमजूरांची संख्या जास्त दिसून येते.

रोहयो नियमांची माहिती असलेल्या शेतमजूरांचे वर्गीकरण

लोटेवाडी, कटफळ, इटकी या गावांमधील १०० शेतमजूरांच्या मुलाखती व निरीक्षणावरून असे आढळले की, शेकडा ८०% शेतमजूरांना रोहयो कायदा व नियमांची अजिबात माहिती नाही. तर १०% शेतमजूरांनी रोहयो नियमांची थोडीफार माहिती आहे असे सांगितले. १०% शेतमजूरांनी रोहयो कामांच्या अनुभवावरून कामाची माहिती असल्याचे सांगितले. यावरून असे लक्षात येते की, रोहयोची नियमाची निरक्षर असल्यामुळे अनेक रोहयोमजूरांना माहिती नाही.

रोहयो कामाची मागणी :-

रोहयोचे काम हे मागणीनुसार दिले जाते. ग्रामीण भागात राहणारा १८ वर्षापुढील कोणताही स्त्री-पुरुष रोहयोच्या कामाची मागणी करू शकतो. रोहयो कामाची मागणी कशी करावयाची याची माहिती नाही. असे १०० शेतमजूरांपैकी १०% रोहयो मजूरांनी सांगितले. ४०% शेतमजूरांनी रोहयो कामाची मागणी तलाठी यांच्याकडे अर्जाद्वारे करतो असे सांगितले. ४०% रोहयो मजूरांनी सरपंच, ग्रामसेवक यांच्याकडे ग्रामसभेत मागणी करतो असे सांगितले. १०% रोहयो मजूरांनी अमंलबजावणी कर्मचाऱ्यांकडे रोहयो कामाची मागणी करतो असे सांगितले.

रोहयो कामाची सुरूवात :-

रोहयोच्या कामाची मागणी केल्यानंतर रोहयोचे काम २० दिवसांनी मिळते असे ६०% रोहयो मजूरांनी सांगितले. २०% रोहयोमजूरांनी गावात दवंडीद्वारे माहिती कळाल्यानंतर रोहयो कामाची माहिती समजते असे सांगितले. १०% रोहयो मजूरांना हजेरी सहाय्यकाकडून रोहयो कामाची माहिती समजते. ५% रोहयो मजूरांनी ग्रामपंचायत बोर्डावर, ग्रामसभेत रोहयो काम सुरू झाली असल्याची माहिती कळते असे सांगितले. ५% रोहयो मजूरांनी आपल्या सहकाऱ्यांकडून रोहयो कामे सुरू झाली आहेत याची माहिती कळते असे सांगितले.

रोहयो कामावर ओळखपत्राची आवश्यकता :-

१०० रोहयो मजूरांपैकी ८०% रोहयो मजूरांजवळ ओळखपत्र होते. २०% रोहयो मजूरांना तात्पुरते ओळखपत्र मिळेपर्यंत रोहयो काम दिले होते. रोहयोच्या कामावर ओळखपत्र नाही म्हणून कामावर घेणार नाही अशी तक्रार नव्हती. ओळखपत्राशिवाय रोहयोच्या कामावर घेतले जाते असे सांगितले.

रोहयो कामाची प्रत्यक्ष सुरूवात :-

रोहयोच्या कामाची सुरूवात करण्याअगोदर तोंडी माहिती अमंलबजावणी अधिकारी किती काम केल्यानंतर किती मजूरी मिळेल ह्याची माहिती देतात. मग मोजमापाचे प्रात्यक्षिक दाखवून काम सुरू होते. रोहयोचे काम हे रोजंदारीचे नसून ते अंगावरचे काम असते, म्हणजे जेवढे मजूर काम करील त्या प्रमाणात रोहयो मजूरांना कामाची मजूरी मिळते. अंगावरचे काम असल्यामुळे ते मजुरांच्या गटाला दिले जाते. मजुरांच्या या गटांची (गँगची) कमीत कमी संख्या ५ व जास्तीत जास्त संख्या १२ असते. हे गट एकाच गावातल्या लोकांचे किंवा शेजारी राहणाऱ्या लोकांचे असतील तर त्यांच्यात चांगले सहकार्य निर्माण होऊ शकते.

अंगावरची कामे प्रामुख्याने नालाबंडिंग, पाझर तलाव, गावतलाव, सामाजीक वनीकरण इ. कामे गटांद्वारे केली जातात. शेततळी, तलावातील गाळ काढणे, सार्वजनिक विहिरी इ. ची कामे हजेरीवर दिली जातात. त्यामुळे रोहयो मजूरांना कामाच्या स्वरूपाची माहिती कामाला सुरूवात होण्याअगोदर दिली जाते. कामाची पूर्ण माहिती दिल्यानंतर रोहयो कामांना प्रत्यक्ष सुरूवात होते.[१]

रोहयो कामाचे अंतर :-

रोहयोचे काम करणाऱ्या मजूरांच्या सांगण्यानुसार सर्व रोहयो मजूरांना रोहयोचे काम हे गावातच मिळते असे सांगितले. त्यामुळे रोहयो कायदयानुसार रोहयो मजूरांना ५ कि. मी. आतच काम दिले जाते. रोहयो मजूरांनी बाहेरगावी जाऊन रोहयोचे काम करण्याचा प्रसंग आला नसल्याचे सांगितले.

रोहयो कामाचे तास किंवा कामाच्या वेळा :-

रोहयोच्या कामाचे तास साधारणपणे ६ ते ७ तास होतात असे सांगितले. सकाळी ८ ते ११ पर्यंत नंतर एक तास विश्रांती मिळते पुन्हा १२ ते ३ वाजेपर्यंत काम चालते. अंगावरचे काम असल्यानंतर कामातील गटांच्या (गँग) सोयीनुसार ते कमी जास्त वेळ काम केले जाते.

रोहयोच्या कामाचे मोजमाप :-

कामाच्या सुरूवातीनंतर प्रत्येक पंधरा दिवसांच्या कालखंडानंतर अमंलबजावणी अधिकाऱ्यांमार्फत कामाचे मोजमाप होते. प्रत्येक गटाने १५ दिवसात किती काम केले, कोणत्या दर्जाचे काम केले याची नोंदवहीत नोंद केली जाते. याच नोंदीप्रमाणे व उपस्थितीच्या नोंदीप्रमाणे केलेल्या कामानुसार मजूरी दिली जाते. लोटेवाडी, कटफळ, इटकी या गावातील घेतलेल्या १०० रोहयो मजूरांच्या मुलाखतीप्रमाणे ६०% रोहयो मजूरांनी कामाचे मोजमाप योग्य होते असे सांगितले. तर २०% शेतमजुरांनी कामाच्या मापामध्ये फसवणूक होत असल्याची तक्रार केली. ५% शेतमजूरांनी काही वेळा आम्ही कामावर नसताना कामाची मोजमापे घेतली जात असल्याची तक्रार केली. याचा अर्थ काही रोहयो मजुरांची रोहयो कामाच्या मोजमापासंबंधी तक्रार आहे. १५% शेतमजूरांनी कामाची मापे योग्य असल्यासंबंधी हजेरी सहाय्यकांवर विश्वास ठेवला आहे. यावरून बहुतांश कामाचे माप ठरलेल्या नियमानुसार नोंद होते असे सांगितले. तर काही रोहयो मजूरांनी कामाच्या मोजमापासंबंधी शंका व्यक्त केल्या आहेत.[२]

रोहयोच्या कामाचा मोबदला :-

रोहयोची कामे गँग किंवा गटांना दिली जातात. रोहयोची मजूरी कामाला सुरूवात केल्यानंतर साधारणपणे दोन आठवड्यानंतर कामाचे मोजमाप होऊन त्याप्रमाणे मजूरांना मजूरी दिली जाते. गटांमध्ये मिळालेल्या

पगाराचे वाटप केले जाते. लोटेवाडी, कटफळ, इटकी या गावातील रोहयो मजूर अभ्यासावरून असे लक्षात आले की, गटांमध्ये रोहयो पगाराचे वाटप करताना पुरुष मजुरांना जास्त रक्कम दिली जाते. स्त्री मजुरांना कमी रक्कम दिली जाते. रोहयोच्या कामाचा मोबदला हा पैशाच्या व धान्याच्या स्वरूपात दिला जातो. २००३-२००४ या वर्षी तीनही गावामध्ये दुष्काळ पडला होता. त्यावेळी रोहयो मजूरांना कामाचा मोबदला म्हणून कमी किंमतीत धान्य देण्यासाठी कुपन्स दिली जात होती. या कुपन्सवर रेशन दुकानात टंचाई परिस्थीत गहू, तांदूळ, ज्वारी, साखर हे बाजारभावापेक्षा कमी किंमतीत रोहयो मजूर ना उपलब्ध करून दिले जात होते. इतरवेळी मात्र पैशाच्या स्वरूपात रोहयो कामाचा मोबदला दिला जातो.

वेतनातील तफावत :-

१०० रोहयो मजूरांच्या मुलाखतीवरून प्रत्यक्ष सकृतदर्शनी असे आढळले की, गटागटांनी काम करतांना मिळणारे वेतन हे पुरुषांना स्त्रियांपेक्षा जास्त दिले जाते. हजेरी कामावरही पुरुषांपेक्षा स्त्रियांना वेतन कमी दिले जाते. हजेरी कामावर पुरुषाला ४५ रुपये हजेरी असल्यास स्त्रीयांना ३० ते ३५ रुपये हजेरी दिली जाते. त्याची कारणे विचारली असता ती खालीलप्रमाणे सांगितली.

१) स्त्रिया ह्या पुरुषांपेक्षा कमी काम करतात.

२) स्त्रियांकडून खुदाईचे काम होत नाही.

३) स्त्रिया फक्त माती वाहून नेण्याचे काम करतात.

४) स्त्रियांना पुरुषाप्रमाणे अंगमेहनतीची कामे जमत नाहीत.

त्यामुळे रोहयो कायद्यातील स्त्री-पुरुषांना 'समान कामासाठी समान वेतन' ह्या गोष्टी वास्तविक परिस्थितीत दिसून येत नाहीत. गटांमध्ये काम करताना शेकडा २% स्त्रियांनी पुरुषांप्रमाणे वेतन मिळते असे सांगितले. यामध्ये काहीवेळा या गटातील स्त्री-पुरुष हे एकाच घरातील असतील किंवा नातेवाईक असल्यास समान वेतन गटांमध्ये वाटून घेतले जाते. यावरून असे दिसते की, स्त्री-पुरुषांमध्ये वेतनाबाबत भेदभाव केला जातो.

रोहयोच्या कामावर मिळणाऱ्या सोयी-सुविधा :-

रोहयोवर काम करणाऱ्या १०० रोहयो मजूरांपैकी ९०% रोहयो मजूरांनी रोहयो कामावर कोणकोणत्या

सुविधा दिल्या जातात याबद्दलची माहिती नसल्याचे सांगितले. १०% रोहयो मजूरांनी पिण्याचे पाणी, ४० ते ५१ या वयोगटातील मजूरांनी, तसेच या पुढील वयोगटातील मजूरांनी पिण्याचे पाणी, सावलीची व्यवस्था, ह्या गोष्टी व्यतिरिक्त इतर कोणत्याही सोई-सुविधांचा लाभ मिळत नसल्याचे सांगितले. ह्यावरून असे लक्षात येते की, बहुतांश रोहयो मजूर अशिक्षित असल्यामुळे रोहयो कामावर कोणत्या सुविधा मिळतात याची त्यांना माहिती नाही. अधिकाऱ्यांनीही ही माहिती केव्हा सांगितली नसल्याचे म्हटले. फक्त रोहयो कामावर पिण्याचे पाणी दिले जाते.

रोहयो कामावर काम करणाऱ्या स्त्री मजूरांना मिळणाऱ्या सोई-सुविधा :-

रोहयोवर कामावर काम करणाऱ्या १०० रोहयो मजूर पैकी शेकडा ४०% स्त्रिया काम करतात. शेकडा ३८% स्त्रियांनी स्त्रियांना देण्यात येणाऱ्या सोई-सवलतीसंबंधी माहिती नसल्याचे सांगितले. रोहयो कामावर काम करणाऱ्या स्त्रिया या बहुतांश निरक्षरच असतात. त्यामुळे त्याना स्त्रियांना मिळणाऱ्या शासन सवलतीची माहिती नसते. अशा प्रकारची जाणीव जागृतीही केली जात नाही. फक्त शेकडा २% स्त्रियांनी थोडीफार माहिती सांगण्याचा प्रयत्न केला. लहान मुले असलेल्या स्त्रियांनाही रोहयोच्या कामावर जाता यावे यासाठी कामाच्या ठिकाणी पाळणागृहाची व्यवस्था केली जाते. अशा प्रकारची व्यवस्था १९७२ च्या दुष्काळात केली होती असे वृध्द स्त्रियांनी सांगितले. दुपारच्या सुट्टीत रोहयोच्या कामाच्या ठिकाणी विश्रांतीसाठी, सावलीचीही सोय करण्यात आल्याचे सांगितले. रोहयोच्या कामावर असणाऱ्या काही स्त्रियांनी कुटुंबनियोजनाची शस्त्रक्रिया करून घेतल्यानंतर चौदा दिवस पगारी रजा घेतल्याचे सांगितले. कामाची ठिकाणी पिण्याच्या पाण्याची व्यवस्था केली जाते. यासाठी पाणी कामाच्या ठिकाणी देण्यासाठी खास रोजंदारीवर मजूर असल्याचे सांगितले. जास्त दिवस काम चालणाऱ्या ठिकाणी ह्या सोयी सुविधा मिळतात. कमी काम असेल तर अशा प्रकारच्या सोई सवलती दिल्या जात नाहीत.[३]

स्त्री मजूरांच्या समस्या :-

रोजगार हमी योजना ही दूरदृष्टीकोन डोळ्यासमोर ठेऊन राबविण्यात आली आहे. स्त्रियांना प्रसुती काळातील सुविधा, कुटुंबनियोजनासाठी पगारी रजा, लहान मुलांसाठी पाळणागृहे, अपघात झाल्यास सोई सुविधा या सोई-सुविधांचा समावेश कायद्यामध्ये आहे. परंतु प्रत्यक्षात त्याची अमंलबजावणी होत नाही.

SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR.

स्त्रियांच्या हक्काची प्रसुती काळातील रजा आहे. मात्र ही रजा मंजूर करीत असताना कामाची अमंलबजावणी करणाऱ्या कर्मचाऱ्यांची उपकाराचीच वागणूक असते. ही रजा अथवा तत्सम सुविधा देऊन मेहरबानी करीत असल्याचा आव या कर्मचाऱ्यांचा असतो. याशिवाय स्त्री मजूरांची लहान मुले असतील तर त्यांना दूध पाजण्यासाठीही वेळ दिला जात नाही. लहान मुलांची जबाबदारी आईवरच असते. त्याला दूध देणे हे तिचे कर्तव्य ठरते आणि हक्कही. अशावेळी तिचे हक्क डावलून दादागिरीची भाषा केली जाते. याचा परिणाम स्त्रियांच्या मानसिकतेवर होतो. विशेष म्हणजे हा त्रास स्त्री मजूर कोणाला बोलावूनही दाखवत नाही. स्त्रियांच्या मानसिक आणि शारीरीक आरोग्याचा विचार रोहयो कामावर असताना केला जात नाही. रोजगार हमी योजनेतील कामांवर काम करणाऱ्या स्त्रिया शिक्षण घेतलेल्या नाहीत. मुलांचे आरोग्य, विज्ञान, हक्क याविषयी त्यांच्यामध्ये जाणीव जागृती नाही. कुठल्याही महिला संस्था अथवा संघटना त्यांच्यापर्यंत पोहोचलेल्या नाहीत. फार मोठ्याप्रमाणात कामे चालु असतील तरच या सुविधा दिल्या जातात. त्यामुळे स्त्रियांची ती एक गैरसोय होते.

रोजगार हमी योजनेतील कामांवर काम करणाऱ्या स्त्री मजूरांचे सर्वात मोठे दुखणे म्हणजे अपुरे आणि अनियमित वेतन. नियमानुसार रोजगार हमी योजनेमध्ये काम करणाऱ्या प्रत्येक मजूराला प्रत्येक दिवसासाठी प्रत्येक पुरुषाला ४५ रुपये वेतन मिळते. स्त्री मजूरांच्या हातात मात्र ३५ रुपये एवढेच वेतन मिळते. स्त्री म्हणून मजूरांत हा भेदभाव केला जातो. नाईलाजास्तव स्त्री मजूरांना कमी पैसा हा घ्यावा लागतो. रोजगार हमी योजनेमध्ये नेमलेल्या कर्मचाऱ्यांच्या मनावर कुणा मजुराला कामावर घ्यावयाचे की नाही हे ठरते. स्त्रियांचा काम करण्याचा हक्क व समान वेतनाचा हक्क आजही नाकारला जातो. ही निश्चीतच वस्तुस्थिती आहे. या तीन गावातील रोहयो कामावरील स्त्री मजूरांशी चर्चा करून व निरीक्षणावरून माहिती सांगितली आहे. रोहयो कामावरील स्त्री मजूरांना आपल्यावर अन्याय झाल्याचे लक्षात येते. पण त्या तक्रार करीत नाहीत.

शेतमजूरी व रोहयो मजूरी यातील तफावत :-

तीन गावातील १०० रोहयो मजूरांपैकी शेतमजूर व रोहयो मजूर यात मोठी तफावत असल्याचे ७०% मजूरांनी सांगितले. त्यांच्या मते शेतामध्ये शेतीच्या हंगामात विशेषतः सुगीच्या दिवसात ७० ते ८० रुपये हजेरी मिळते असे सांगितले तर इतरवेळी ६० ते ७० रुपये हजेरी पडते. रोहयोच्या कामावर ४० ते ४५ रुपये हजेरी सरासरी मिळते. काही वेळा ५० ते ५५ रुपये हजेरी पडते असे सांगितले. ३०% मजूरांनी शेतमजूरी व रोहयो मजूरी यात थोडाफार फरक असल्याचे सांगितले. यावरून असे लक्षात येते की, शेतमजुरी व रोहयो कामाच्या

हजेरीमध्ये तफावत आहे आणि सुगीच्या दिवसात शेतावर काम करणाऱ्या मजुरास जास्त मजुरी मिळते.

रोहयो कामावर यंत्राचा वापर :-

रोहयोचे काम हे विकासाकरिता आहेच पण त्याचा उद्देश मजूरांसाठी अधिकाधिक रोजगार निर्माण करणे हा आहे. रोहयो कामामध्ये यंत्राचा वापर होत नसल्याचे शेकडा ६०% शेतमजूरांचे म्हणणे आहे. ३०% रोहयो मजूरांनी यंत्राचा वापर होत असल्याचे म्हटले आहे. १०% रोहयो मजूरांनी याबाबत माहिती नसल्याचे सांगितले जाते. परंतु लोटेवाडी, कटफळ आणि इटकी या गावामध्ये २००३-२००४ या कालावधीमध्ये दुष्काळ सदृश्य परिस्थिती निर्माण झाली होती. त्यावेळी शेततळ्याची कामे मोठ्या प्रमाणात राबविली होती. त्यावेळी या गावामध्ये शेततळ्यांची खुदाई जेसीबी सारख्या मोठ्या यंत्रांचा वापर करून रोहयोची कामे घेण्यात आली होती. असे अनेक रोहयो मजूरांनी सांगितले आहे. ही गोष्ट अधिकाऱ्यांच्या निर्दशनास आल्यानंतर तेथील रोहयोची शेततळ्याची कामे तात्पुरती बंद करण्यात आली होती. रोहयोमध्ये म्हणूनच यंत्रांचा कमीत कमी वापर केला जातो. रोहयोमध्ये अकुशल कामांना प्राधान्य देण्यात येते. कामाच्या एकूण खर्चापैकी कमीत कमी शेकडा ५१% खर्च हा मजूरांच्या मजूरीवर खर्च करण्याचे बंधन रोहयोत आहे. यामुळे यंत्रांच्या वापरावर मर्यादा आल्या आहेत. काही रोहयोच्या कामावर मात्र यंत्रांचा वापर टाळता येत नसते. उदा. रस्ते तयार करताना, ट्रक्टर, पाण्याचा टँकर, रोड रोलर यांचा वापर करावा लागतो. तर विहीरीच्या कामावर ट्रॉली, बोअर यांचा वापर करावा लागतो. पण जे काम मानवी श्रमाने करता येण्याजोगे आहे त्या कामाला मशीन किंवा यंत्रे लावता येत नाहीत. बुलडोझर, जेसीबी सारखी मोठी यंत्रे लावणे हा रोहयोतील गंभीर गैरप्रकार आहे. रोहयोची कामे कंत्राटदार, ठेकेदार यांच्याकडून झाली नसल्याचे रोहयो मजूरांचे म्हणने आहे.

बेकारभत्ता व रोहयोचे काम :-

९०% शेतमजूरांनी बेकारभत्ता यासंबंधी माहिती नसल्याचे सांगितले. व तो कधी मिळालाही नसल्याचे रोहयो मजूरांचे म्हणने आहे. १०% शेतमजूरांना बेकारभत्ता मिळतो एवढे माहिती आहे. तो कधी ही मिळाला नसल्याचे सांगण्यात आले.

दुष्काळ परिस्थितीमधील रोहयो कामाचा अनुभव :-

दुष्काळ परिस्थितीमधील रोहयो कामाचा अनुभव नसल्याचे १५ ते ३० वयोगटातील रोहयो मजूरांनी

सांगितले. ३० ते ६० पर्यंतच्या वयोगटातील अनुभवी व्यक्तीनी दुष्काळ परिस्थितीत विशेषतः १९७२ च्या दुष्काळात गावात रोजगार हमी योजनेच्या राबविलेल्या कामाची माहिती दिली. दुष्काळच्या काळात शेतामध्ये शेतकरी, शेतमजूर यांना कामे नसल्यामुळे रोहयोची कामे फार उपयुक्त ठरतात असे अनेक अनुभवी रोहयो मजूरांनी सांगितले. रोहयोच्या कामांची मागणी दुष्काळात जास्त असते. त्यावेळी मागणीनुसार रोहयोची कामे होतात. सर्व गरजूंना कामे दिली होती. १९७२ च्या दुष्काळ हा मोठा दुष्काळ होता. यावेळी सरकारने गावात रोहयोची अनेक कामे राबविली. त्यावेळी मजूरांना पैशाबरोबर धान्य देण्याची व्यवस्था केली. अनेक लोकांना या दुष्काळात जीवनदान मिळाल्याची कबुली रोहयो मजूरांनी दिली. दुष्काळ व टंचाई परिस्थितीत रोहयो कामाशिवाय पर्याय नसतो असे त्यांनी सांगितले.

रोहयोच्या कामाचे प्रकार :-

रोहयोचे काम हे दोन प्रकारचे असते. हजेरीवर होणारे काम, अंगावरचे (उक्ते) काम. यामध्ये ९०% रोहयोमजूरांनी अंगावरचे काम परवडत असल्याचे सांगितले. कारण या प्रकारात केलेल्या कामाप्रमाणे मोबदला मिळतो. त्यामुळे रोहयो मजूरांचा या कामाकडे जास्त ओढा दिसून येतो. दोन्ही प्रकारची कामे परवडत असल्याचेही १०% रोहयो मजूरांचे म्हणने आहे.

रोहयोच्या कामाचे स्वरूप :-

तीनही गावात रोहयोची शेततळी, नालाबंडिंग, कंटुर बंडिंग, गावतळी, पाझर तलाव, बंधारे, सार्वजनिक विहिरी, फळबाग विकास, रस्ते इ. विकास काने राबविण्यात आल्याचे सांगण्यात आले. सुमारे शेकडा ८०% रोहयो मजूरांनी अपूर्ण कामाची माहिती नसल्याचे सांगितले. सुमारे शेकडा २०% मजूरांनी अपूर्ण कामे झाल्याची सांगितले.

रोहयो कामावरील तक्रारीचे निवारण :-

रोहयो कामावर काम करीत असताना मजूरांच्या कामाचे मोजमाप, पगार यासंबंधीच्या तक्रारी हजेरी सहाय्यक किंवा संबंधित अधिकाऱ्यांकडे केली जाते. रोहयो मजूरांनी दिलेल्या माहितीनुसार शेकडा २०% रोहयो मजूरांनी संबंधित अधिकाऱ्याकडे तक्रार केल्यास त्याचे निवारण होते असे सांगितले. शे. ६०% रोहयो मजूरांच्यामते संबंधित अधिकारी तक्रारीकडे दुर्लक्ष करीत असल्याचे सांगितले आहे. शे. २०% रोहयो मजूरांनी

संबंधित अधिकारी तक्रारीच ऐकून घेत नसल्याचे सांगितले. यावरून असे लक्षात येते की, रोहयो मजूरांच्या तक्रारीकडे बरेच संबंधित अधिकारी दुर्लक्ष करीत आहेत.

कोणत्या हंगामात रोहयो कामाची मागणी अधिक असते :-

ऊस तोडणी शेतमजूर गावाकडे परत आल्यानंतर, शेतामधील रब्बी हंगामातील सुगी पूर्ण झाल्यानंतर म्हणजे साधारणपणे मार्च ते जुलै पर्यंत रोहयो कामाची मागणी जास्त असते.

रोहयो कामासंबंधी जाणून घेतलेली रोहयो मजूरांची मते :-

लोटेवाडी, कटफळ, इटकी या गावांमधील १०० रोहयो मजूरांची मते, जाणून घेतल्यास सर्व रोहयो मजूरांनी रोहयोचे काम व योजना गोरगरिब, भूमीहिन शेतमजूर व दुष्काळाच्या काळात शेतकरी या सर्वांना काम मिळवून देणारी ही योजना चांगली असल्याचे मत व्यक्त केले. दुष्काळाच्या परिस्थितीमध्ये जीवन जगण्यासाठी व गावातील विकास कामे पूर्ण करण्यासाठी ही महत्वाची योजना ठरते. रोहयोच्या कामामुळे कामासाठी दुसऱ्या गावी जाण्याची गरज नाही. रोहयोच्या कामावर काम करून कष्टाचे पैसे मिळवून अभिमानाने जगता येते असे सांगितले. १९७२ च्या दुष्काळात रोहयो ही फार उपयुक्त ठरल्याचे अनेक वयोवृध्द, अनुभवी रोहयो मजूरांनी सांगितले.

रोहयो कामावरील मजूरांच्या समस्या :-

रोजगार हमी योजनेच्या कामावरील रोहयो मजूरीचे वाटप दर आठवड्यास किंवा पंधरा दिवसांच्या आत झाले पाहिजे परंतु ते महिनाभर होत नसल्याची रोहयो मजूरांची तक्रार आहे. रोहयोच्या कामावर मजूरांना दुष्काळी परिस्थितीत कामे वेळेवर मिळत नाहीत. दुष्काळाच्या काळात रोहयोची कामे गरजेपेक्षा कमी असतात. रोहयोच्या कामावर मिळणाऱ्या सर्व सोयी-सुविधा मिळत नाहीत. दुष्काळाच्या परिस्थितीमध्ये कुपन्स द्वारा मिळणारे धान्य वेळेवर मिळत नाही. निकृष्ट दर्जाचे धान्य दिले जाते. धान्याचा साठा कमी असल्यास केवळ जवळच्या हितसंबंधी लोकांना फक्त धान्य दिले जाते. काही रोहयो मजूरांनी २००३-२००४ च्या दुष्काळ परिस्थितीमध्ये कुपन्सवर मिळणारा गहू बाहेर विकून कर्मचाऱ्यांनी गैरव्यवहार करून भ्रष्टाचार केल्याचे सांगितले. ही एक रोहयो मधील गंभीर समस्या दिसून येते. रोजगार हमी योजनेवर मिळणारी मजूरी ही इतर मजूरीपेक्षा कमी प्रमाणात मिळते. भूमिहीन रोहयो मजूरांना आपल्या कुटुंबाचा खर्च भागविणे अशक्य होते. त्यामुळे रोहयो

मजूरांची मजूरी वाढविली पाहिजे. रोहयोची कामे वेळेला मिळत नाहीत. शेतामधील सुगीचे दिवस संपल्यानंतर छोटे शेतकरी, भूमिहीन शेतमजूर रोहयो कामाची वाट पाहतात. योग्य वेळेला कामे मंजूर होत नाहीत. मोठ्या यंत्राद्वारे केलेल्या कामामुळे मजूरांच्या महिन्याचे वेतन व जेसीबी सारख्या एका यंत्राचे एका दिवसाचे काम समान असते. या यंत्रामुळे मजूरांना रोजगार मिळत नाही. रोहयो काम कमी असल्यास गरिबांना न मिळता काही प्रभावी गटांनाच दिली जातात. गावात रोहयोचे काम सुरू झाले आहे हे वेळेवर समजत नाही. रोहयोच्या कामावर आगाऊ रक्कम देण्याची तरतूद नसल्यामुळे कौटुंबिक अडचणी आल्यास रोहयोच्या कामाचा मजूरांना फायदा होत नाही. रोहयोचे काम हे अमंलबजावणी कर्मचाऱ्यांच्या मर्जीनुसारच करावे लागते.[४]

लोटेवाडी, कटफळ, इटकी या गावांमधील १५ शेतकऱ्यांची रोहयो कामासंबंधी व रोहयोच्या यशापयशाबाबत मते जाणून घेतली.

शेतकऱ्यांच्या शेतजमिनीचे वर्गीकरण

कोष्टक क्र. ४.१०

शेतजमीन	लागवडीखालील क्षेत्र	जिराईत क्षेत्र	शेतकऱ्यांची संख्या
१० एकर	५ एकर	५ एकर	५
२० एकर	८ एकर	१२ एकर	४
२५ एकर	१५ एकर	१० एकर	३
३० एकर	१५ एकर	१५ एकर	२
३५ एकर	१६ एकर	१९ एकर	१
१२० एकर	५९ एकर	६१ एकर	१५

वरील कोष्टक क्रं. ४.१० प्रमाणे १५ शेतकऱ्यांची एकूण जमीन १२० एकर असून जिराईत क्षेत्र सर्वात जास्त असून ते ६१ एकर आहे. लागवडीखालील क्षेत्र जिराईत क्षेत्राच्या कमी असून ते ५९ एकर आहे. यामध्ये लागवडीखालील क्षेत्राचे प्रमाण दुष्काळ परिस्थिती निर्माण झाल्यास कमी दिसून येते.

शेतकऱ्यांचे शिक्षणानुसार वर्गीकरण

कोष्टक क्र. ४.११

शिक्षण	शेतकऱ्यांची संख्या
प्राथमिक	३
माध्यमिक	२
उच्च माध्यमिक	७
पदवी	-
निरक्षर	३
	१५

वरील ४.११ या कोष्टकावरून १५ शेतकऱ्यांपैकी उच्च माध्यमिक शिक्षणाची संख्या सर्वात जास्त असून ती ७ आहे. पदवीपर्यंतचे शिक्षण कोणीही घेतले नाही. प्राथमिक शिक्षण घेतलेले शेतकरी ३ आहेत. माध्यमिक शिक्षणाची संख्या २ असून, निरक्षर शेतकऱ्यांची संख्या ३ आहे.

शेतकऱ्यांच्या कुटुंबातील सदस्यसंख्या

कोष्टक क्र. ४.१२

कुटुंब सदस्य संख्या	शेतकऱ्यांची संख्या
५ ते ८	५
८ ते ११	४
११ ते १३	४
१३ ते १५	२
	१५

वरील कोष्टक ४.१२ नुसार, सर्वात जास्त कुटुंबाची सदस्य संख्या ही २ शेतकऱ्यांची आहे. ५ शेतकऱ्यांच्या कटुंबातील सदस्य संख्या ५ ते ८ च्या दरम्यान आहे. ८ ते १३ कुटुंबातील सदस्य संख्या ४

शेतकऱ्यांची दिसून येते.

शेतकऱ्यांच्या शेतामध्ये घेतली जाणारी पिके :-

१५ शेतकऱ्यांच्या शेतांमध्ये प्रामुख्याने ज्वारी, बाजरी, गहू, मका, ऊस, डाळींब, बोर, कडधान्ये, भाजीपाला इ. पिके घेतली जातात.

रोहयो कामासंबंधी माहिती :-

१५ शेतकऱ्यांपैकी ७ शेतकऱ्यांनी रोजगार हमी योजनेच्या कामांची माहिती असल्याचे सांगितले. ५ शेतकऱ्यांनी त्याबद्दल फारशी माहिती नसल्याचे सांगितले. रोजगार हमी योजनेची माहिती असल्याचे ३ शेतकऱ्यांनी सांगितले. ७ शेतकऱ्यांनी रोजगार हमी योजनेच्या कामावर काम केल्याचे सांगितले.

रोहयोची शेतात राबविलेली कामे :-

७ शेतकऱ्यांनी शेततळी, ओढ्यावरील बंधारे, नालाबंडिंग इ. कामे शेतात राबविल्याचे सांगितले. ५ शेतकऱ्यांनी शेततळी, कट्टुर बंडिंग, पाझर तलाव या प्रकारची कामे झाली असल्याचे सांगितले तर २ शेतकऱ्यांनी फळबागा लागवड, पाझर तलाव इ. रोहयो कामे शेतात राबविल्याचे सांगितले.

रोहयोच्या कामामुळे शेतकऱ्यांना मिळणारा भूसंपादनाचा मोबदला :-

१५ शेतकऱ्यांपैकी ५ शेतकऱ्यांनी भूसंपादनाचा मोबदला मिळत असल्याचे सांगितले. १० शेतकऱ्यांनी भूसंपादनाचा मोबदला मिळत नसल्याची तक्रार केली आहे. ५ शेतकऱ्यांनी भूसंपादनाचा मोबदला मिळत असला तरी तो मिळण्यास फार विलंब होतो असे सांगितले. रोहयो कामासंदर्भातील भूसंपादन मोबदला शेतकऱ्यांना तात्काळ देण्याची व्यवस्था करण्यात यावी असे शेतकऱ्यांचे मत आहे. शेतकऱ्यांच्या जमिनी संपादित करीत असताना दोन तृतीयांश रक्कम ॲडव्हॉन्स म्हणून दिली पाहिजे अशी शासकीय तरतूद आहे. शेतकऱ्यांच्या जमीनी संपादित करून त्यांना वेळेवर मोबदला न मिळाल्यामुळे व काहीना फारच कमी मोबदला दिला जातो. शासकीय नियमानुसार भूसंपादन मोबदला मिळत नाही त्यामुळे शेतकऱ्यांवर उपासमारीची पाळी येते असे सर्व शेतकऱ्यांनी सांगितले.

शेतीच्या कामासाठी शेतमजूरांची कमतरता :-

शेतीच्या कामासाठी शेतमजूरांची कमतरता भासत नसल्याचे ११ शेतकऱ्यांचे मत आहे. कारण शेतीच्या कामाच्यावेळी रोहयोची कामे बंद असतात. दुष्काळाच्या परिस्थितीमध्ये बागाईत क्षेत्र कमी झालेले असते. त्यामुळे शेतमजूरांची रोहयोच्या कामामुळे अडचण निर्माण होत नसल्याचे सांगितले. ३ शेतकऱ्यांनी मात्र सुगीच्या दिवसात शेतमजूरांची अडचण येते असे सांगितले. ऊसतोडणी मजूर परगावी मजूरीसाठी गेले असल्यास काहीवेळा शेतमजूरांची कमतरता भासते असे सांगितले. तसेच एका शेतकऱ्यांने मात्र शेतीसाठी मजूर लावत नसल्याचे सांगितले.

रोहयोच्या कामाची शेतकऱ्यास उपयुक्तता :-

रोजगार हमी योजनेची कामे राबविल्यामुळे शेतीस फार मोठा फायदा झाल्याचे सर्व शेतकऱ्यांचे म्हणने आहे. रोहयोची कामे ही शक्यतो जिराईत क्षेत्र, माळरान परिसरात घेतली जातात. पाझर तलाव, नालाबंडिंग, शेततळी ह्या रोहयोच्या कामामुळे तेथे पडणारे पावसाचे पाणी जाग्यावरती अडविल्यामुळे ते ओढ्या, नाल्यांद्वारे वाहून जात नाही. पाझर तलावामुळे, तलावाच्या परिसरातील अनेक लोकांना फायदा झाल्याचे सांगण्यात आले. या गावांमध्ये पावसाचे प्रमाण कमी असल्यामुळे पडणाऱ्या पावसाचे पाणी अडवून विहीरींच्या पाण्याची पातळी वाढल्याचे दिसते. लागवडीखालील क्षेत्रही वाढले असल्याचे काही शेतकऱ्यांनी सांगितले.

रोहयोच्या कामाचा शेतकऱ्यास फायदाच होत असल्याचे शेतकऱ्यांचे मत आहे. लोटेवाडी गावातील एका शेतकऱ्यांने रोहयोच्या कामातील शेततळ्याची कामे शासनाकडे मागणी करून राबविलें असल्याचे सांगितले. ह्या शेततळ्यातील पाण्याच्या आधारे त्याने ५ एकर डाळींब क्षेत्र लागवडीखाली आणले असल्याचे सांगितले. ओढ्यावरील बंधारे बांधल्यामुळे व ओढ्याचे वाहून जाणारे पाणी अडविल्यामुळे विहीरीना जास्त दिवस पाणी टिकून राहते. तीनही गावातील शेतकऱ्यांनी गावात कृत्रिम पाणीपुरवठ्याची शेतीस सोय नसल्याचे सांगितले. रोहयोच्या विकास कामामुळे शेतीचे लागवडीखालील क्षेत्र वाढण्यास मदतच होणार आहे. रोहयो कामामुळे जमिनीमधील पाण्याची पातळी वाढून भूजलाच्या पातळीमध्ये समतोल राखण्यास मदत होते. सर्व शेतकऱ्यांनी विहीरीच्या पाण्याद्वारे शेती करीत असल्याचे सांगितले. सांगोला तालुक्यात दुष्काळसदृश्य परिस्थिती निर्माण होत असली तरी रोहयोची विकास कामे राबविल्यामुळे फळबागासाठी विशेषतः डाळिंब, बोर, सीताफळ अशा फळबागांची लागवड मोठ्या प्रमाणात होत आहे. पाझर तलाव, गाव तलावाखालील शेतकऱ्यांना

वर्षभर शेतीसाठी पाणी पुरेल एवढी पाण्याची साठवणूक होते. त्यामुळे शेतकऱ्यांच्या दृष्टीने रोहयोची उत्पादक कामे वरदान ठरत असल्याचे सर्व शेतकऱ्यांचे म्हणने आहे. रोहयोच्या कामामुळे गावातील शेतमजूरांना रोजगार ही मिळतो. रोहयोच्या फळबागा विकास कार्यक्रमातून फळबागांची लागवड केल्याचे सांगण्यात आले.

रोहयो कामासंबंधी शेतकऱ्यांची मते :-

रोजगार हमी योजना ही शेतकरी, संपूर्ण गावासाठी, अंगमेहनतीचे काम करण्याची तयारी असणाऱ्या सर्व शेतमजूरांना फायदेशीर योजना आहे. दुष्काळाच्या परिस्थितीमध्ये, टंचाई परिस्थितीमध्ये शेतमजूर व गरीब शेतकऱ्यांना ही योजना फार उपयुक्त ठरते.

शेतकऱ्यांनाही ही रोहयो फार उपयुक्त आहे. पडीक, माळरान जमीनवरती रोहयोतून झाडे लावण्यास महत्वाची योजना आहे. रोहयोच्या विकास कामामुळे पाण्याची साठवून क्षमता वाढली आहे. लागवडीखालील बागाईत क्षेत्र वाढले आहे. त्यामुळे शेतमजूर, शेतकरी ह्या दोहोंनाही ही योजना फायदेशीर ठरत असल्याचे सर्व शेतकऱ्यांचे मत आहे.

लोटेवाडी, कटफळ, इटकी या गावांतील सरपंचांची मुलाखत घेऊन रोहयोविषयी मते जाणून घेतली.

लोटेवाडी, कटफळ, इटकी गावातील सरपंचांची माहिती

कोष्टक क्र. ४.१३

गावाचे नाव	शिक्षण	पदाचा अनुभव	रोहयोविषयी माहिती
लोटेवाडी	१२ वी	९ वर्षे	कामाची माहिती आहे.
कटफळ	पदवीपर्यंतचे	१२ वर्षे	रोहयोविषयी माहिती आहे.
इटकी	१० वी	७ वर्षे	संपूर्ण नाही.

वरील कोष्टक ४.१३ नुसार कटफळ गावातील सरपंचाचे शिक्षण जास्त आहे. कटफळ गावातील सरपंचांना पदाचा अनुभव इतर गावातील सरपंचापेक्षा अधिक आहे. लोटेवाडी गावातील सरपंचांना रोहयोविषयी कामाची माहिती आहे. परंतु योजनेविषयी माहिती नसल्याचे सांगितले. इटकी गावातील सरपंचांनी रोहयोविषयी

SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR.

माहिती नसल्याचे सांगितले.

रोहयोची झालेली गावातील विकास कामे :-

लोटेवाडी, कटफळ आणि इटकी गावातील सरपंचानी रोहयोची राबविलेली विकास कामे खालीलप्रमाणे सांगितली. नालाबंडिंग, पाझर तलाव, गावतलाव, शेततळी, ओढ्यावरील बंधारे, नदीवरील बंधारे, रस्त्यांची कामे, कंटुर बंडिंग, फळबागा लागवड, सामाजिक वनीकरण इ. कामे गावात राबविल्याची सांगितले. लोटेवाडी गावातील सरपंचानी पाझर तलाव, शेततळी, नालाबंडिंग इ. कामांना प्राधान्य दिले तर कटफळ व इटकी गावातील सरपंचांनी फळबागा विकास या रोहयो कामांना प्राधान्य दिले.

रोहयो कामाची गावातील मागणी :-

लोटेवाडी गावातील सरपंच यांनी सांगितले की, गावात रोहयो कामाची गरज आहे. हे रोहयो मजूरांकडून समजते. रोहयोच्या कामावर नेहमी काम करणारे रोहयो मजूर ग्रामसभेत किंवा प्रत्यक्ष भेटून मागणी करतात. कटफळ गावातील सरपंचांच्या मते, रोहयो कामाची मागणी ही ग्रामसेवक यांच्याकडे आलेल्या अर्जावरून, ग्रामसभेस उपस्थित असलेल्या शेतमजूरांकडून रोहयो कामाची मागणी समजते. इटकी गावातील सरपंच यांनी सांगितले की, गावातील अनुभवी प्रौढ रोहयो मजूरांकडून तसेच तलाठी यांच्याकडे असलेल्या नोंदीवरून कामाची मागणी समजते.

ग्रामसभा व रोहयो :-

ग्रामसभेस सर्व मजूर उपस्थित राहू शकत नाहीत. त्यामुळे गावात राहणाऱ्या काही व्यक्ती ग्रामसभेस हजर असतात. त्यामध्ये काही ग्रामस्थ रोहयोच्या कामासंबंधी दुष्काळ परिस्थितीसंबंधी आपली मते मांडतात. त्यावरून रोहयो कामाची गरज किती आहे हे समजते. गावातील रोहयो कामाची गरज असणाऱ्या व्यक्तीकडून अर्ज भरून घेतले जातात. दुष्काळपरिस्थितीमध्ये विशेष ग्रामसभा बोलावून रोहयो कामाचा आढावा घेतला जातो. ग्रामसभेमध्ये रोहयो कामासंबंधी काही रोहयो मजूरांच्या तक्रारी ऐकून घेतल्या जातात. संबंधित अधिकाऱ्यांकडून तक्रारीचे निवारण केले जाते.

रोहयो कामे सुरू झाली आहेत :-

गावातील रोहयो कामे सुरू झाली आहेत. हे गावातील कामे सुरू होण्याच्या अगोदर दवंडीद्वारे कळविले जाते. तसेच गावातील सूचना फलकावर त्याची माहिती दिली जाते. गावसभा घेऊन ही माहिती दिली जाते.

रोहयोची गावात स्थानिक समिती :-

लोटेवाडी, कटफळ आणि इटकी या गावातील सरपंचानी सांगितले की गावात रोहयोची स्थानिक समिती नाही.

गावातील रोहयो कामांच्या तक्रारीचे निवारण :-

लोटेवाडी, कटफळ, इटकी या गावांतील सरपंचानी दिलेल्या माहितीनुसार गावातील शेतकरी, शेतमजूरांच्या तक्रारी येतात. शेतकऱ्यांच्या तक्रारी आल्यास संबंधित शेतकऱ्याला रोहयोच्या कामाचे स्वरूप समजावून सांगितले जाते. तक्रारी करणाऱ्या शेतकऱ्याला संबंधित अधिकाऱ्यांना तहसिल रोहयो ऑफिस मध्ये भेटण्यास सांगितले जाते. कटफळ गावातील सरपंचाची दिलेल्या माहितीनुसार १८ पेक्षा कमी वयातील काही शेतमजूरांना कामावर न घेतल्याबद्दल तक्रारी आल्या होत्या. त्यासंबंधी हजेरी सहाय्यकांना भेटून संबंधित शेतमजूरांना कामावर घेण्यासंबंधी सांगितले व त्यांना रोहयोचे काम मिळवून दिले. दुष्काळ परिस्थितीमध्ये रोहयो मजूरांना कुपन्सवर कमी दरात जे धान्य दिले जाते त्यासंबंधी काही रोहयो मजूरांच्या तक्रारी आल्या होत्या. त्यासंबंधी धान्य वाटप करणाऱ्या रेशन दुकानदारास भेटून तक्रारीचे निवारण केले जाते. वारंवार धान्य वाटपासंबंधी रोहयो मजूरांच्या तक्रारी आल्यास वरिष्ठांकडे तक्रार केली जाते.

रोहयो काम सुरूकरण्यासंबंधी तालुका स्तरावरील रोहयो समितीकडे पाठपुरावा केला जातो. गावातील रोहयो संबंधीच्या तक्रारी तालुका रोहयो समितीकडे किंवा तालुक्याचे आमदार यांच्याकडे केली जाते.

रोहयो कामासंबंधी तीन गावातील सरपंचांची यश-अपयश यासंबंधीची मते

लोटेवाडी गावातील सरपंचांच्या मते, लोटेवाडी गावात रोहयोमुळे गावाचा विकास होण्यास मदत झाली आहे. गावातच रोजगार मिळत असल्यामुळे स्थलांतराचे प्रमाणही कमी झाले आहे. रोहयोच्या विकास कामामुळे पडणाऱ्या पावसाचे पाणी जागोजागी अडवून पाण्याचे नियोजन करणे सोपे झाले आहे. लोटेवाडी

गावातील माणनदीवर कोल्हापूर पध्दतीचा बंधारा बांधण्यात आला असून तेथे रोजगाराबरोबर उत्पादक कामही झाले आहे. २००३-२००४ या दुष्काळाच्या काळात रोहयो कामावर जेसीबी सारख्या यंत्राचा वापर केला आहे अशी रोहयो मजूरांची तक्रार आल्यानंतर संबंधित अधिकाऱ्यांकडे तशी तक्रार करून रोहयो कामावरील यंत्राचा वापर थांबवण्यात आला होता. रोहयोच्या विकास कामामुळे गावातील पाणलोटक्षेत्र वाढले आहे. दुष्काळाच्या काळात संपूर्ण गावातील गरजू लोकांना रोजगार पुरवून रोहयोचे महत्वाचे कार्य केल्याचे दिसून येते. रोहयोच्या कामामध्ये दोष वाटत नसल्याचे सांगण्यात आले. रोहयोची अपूर्ण कामे फक्त गावातील अंतर्गत रस्त्यासंबंधी रखडलेली आहेत. त्यासंबंधी संबंधित अधिकाऱ्याकडे तक्रार केली असून ती अपूर्ण कामे पूर्ण होतील. रोहयो लोटेवाडी गावातील शेतकरी, शेतमजूर ह्यासर्वांना लाभदायक योजना आहे.[५]

कटफळ गावातील सरपंच यांच्या मते, रोहयो ही गावातील विकास कामे पूर्ण करण्यासाठी महत्वाची योजना ठरते. कटफळ हे सांगोला तालुक्यातील ग्रामीण खेडेगाव आहे. त्यामुळे गावीतील सर्वांना शेतीशिवाय पर्याय नाही. गावात शेती हाच मुख्य व्यवसाय असल्यामुळे शेतीवर अवलंबून असणाऱ्या शेतकरी, शेतमजूरांना शेतीकामाशिवाय पर्याय नाही. कटफळ गावामध्ये शेतीच्या पाण्यासाठी कृत्रिम पाणीपुरवठ्याची सोय नाही. गावातील रोहयोच्या विकास कामामुळे पावसाचे पडणारे पाणी साठवून ठेवून त्याचा शेतीसाठी उपयोग केला जातो. शेतकरी, भूमिहीन शेतमजूर ह्या दोघांनाही याचा फायदा होत आहे. महाराष्ट्र शासनाची रोहयो ही योजना चांगली असून गावातील श्रमिक, गरिब, लोकांना काम देवून दारिद्रय निर्मूलन करण्याच्या दृष्टीने महत्वाची योजना आहे. रोहयोच्या कामामुळे शेतकऱ्यांना शेतमजूरांची कमतरता भासते असे वाटत नाही. रोहयोच्या कामाच्या स्वरूपात सातत्याने बदल करणे आवश्यक आहे. गावातील इतर विकास कामे यामध्ये ही रोहयोचा सहभाग आवश्यक आहे. उदा. गावातील गटारे बांधणे, रस्ते बांधणे इ. कामे रोहयोच्या माध्यमातून करता येवू शकतील असे कटफळ सरपंच यांनी मत मांडले. दुष्काळाच्या परिस्थितीमध्ये शेतकरी व शेतमजूर या दोहोंनाही ही योजना महत्वाची ठरते.

इटकी गावातील सरपंच यांच्या मते, रोजगार हमी योजना ही दुष्काळ परिस्थिती वारंवार निर्माण होत असल्यामुळे शेतकरी, शेतमजूरांना रोजगार मिळवून देणारी महत्वाची योजना आहे. पावसाचे पाणी रोहयो कामामुळे अडविल्यामुळे जमीनीतील पाण्याची पातळी वाढण्यास मदत होणार आहे. गावात टेकड्याची, सपाट, सखल भागाच्या जमीनीमुळे रोहयोची कामे राबविण्यास मदत होईल. रोहयोच्या कामाच्या स्वरूपात बदल करणे आवश्यक आहे. गावातील गाव तलावामुळे गावातील सर्व लोकांना, जनावरे यांना पिण्याच्या

पाण्याची सोय झाली आहे. रोहयोच्या कामामुळे शेतकऱ्यांना थोड्याफार पडणाऱ्या पावसाच्या पाण्यावर शेती करता येवू लागली आहे. दुष्काळाच्या काळात रोहयोवर काम करणाऱ्या मजूरांना धान्य दिले जाते. पूर्वीसारखी रोहयोची कामे आता फारशी होत नाहीत. कारण आता गावातील तरूण लोक या स्वरूपाची कामे करीत नाहीत. त्यामुळे १९७२ च्या दुष्काळाप्रमाणे रोहयोची कामे या तीन गावात होत नाहीत. तीनही गावचे सरपंच ही योजना यशस्वी झाली असे सांगतात.

सांगोला तालुक्यातील रोहयो कामाची अमंलबजावणी करणाऱ्या कृषी, जलसंधारण विभाग वर्ग १ व २ अधिकाऱ्यांकडून रोहयोविषयी मिळालेली माहिती.

रोहयोची अमंलबजावणी करणाऱ्या अधिकाऱ्यांच्या कामाचे स्वरूप

कोष्टक क्र. ४.१४

विभागाचे नाव	रोहयो कामाचे स्वरूप	अधिकाऱ्याचे नाव	कामाचा अनुभव
कृषी विभाग	शेततळी, फळबागा विकास	व्ही. व्ही. कोळी	१२ वर्षे
जलसंधारण विभाग वर्ग - १	पाझर तलाव, गाव तलाव	बी. एम. पोळ	१५ वर्षे
जलसंधारण विभाग वर्ग - २	नालाबंडिंग, कंटुर बंडिंग. बंधारे	एस. एम. सुळ	२० वर्षे

वरील कोष्टक क्र. ४.१४ नुसार रोहयोकामाची अमंलबजावणी कृषी विभाग, जलसंधारण विभाग वर्ग - १, वर्ग - २, (सामाजीक वनीकरण, लघुपाटबंधारे विभाग, सार्वजनिक बांधकाम विभाग इ. विभागाची माहिती उपलब्ध झाली नाही.) वरील सर्व विभागामार्फत रोहयो कामाची अमंलबजावणी केली जाते. कृषी विभागामार्फत शेततळी, फळबाग विकास लागवड, जवाहर विहीरी इ. कामे राबविली जातात. जलसंधारण विभाग वर्ग - १ व वर्ग - २ मध्ये पाझर तलाव, गावतलाव, नालाबंडिंग, कंटुर बंडिंग यांची कामे केली जातात. कृषी विभागाचे अधिकारी व्ही. व्ही. कोळी असून, जलसंधारण विभाग वर्ग - १ चे अधिकारी बी. एम. पोळ, जलसंधारण विभाग वर्ग - २ चे एस. एम. सुळ हे अधिकारी आहेत. सर्वात जास्त रोहयो कामाचा अनुभव बी. एम. पोळ यांना आहे. रोहयोचा कमी अनुभव व्ही. व्ही. कोळी यांना दिसून येतो.

रोहयो कामाची अमंलबजावणी :-

व्ही. व्ही कोळी या कृषी अधिकाऱ्यांकडून मिळालेल्या माहितीनुसार, रोहयो कामाची अमंलबजावणी कृषी विभागातील मंजूरी मिळालेल्या कामाची माहिती संबंधित गावातील ग्रामपंचायत, शेतकरी, शेतमजूरांना दिली जाते. रोहयो कामाची सुरूवात करताना रोहयो कामाचे शासकीय नियम सांगितले जातात. किती काम झाल्यास किती मजूरी मिळणार हे प्रथम सांगितले जाते. कृषी विभागातील सहाय्यक अधिकारी या कामाची हजेरी व कामाच्या मोजमापाची नोंद करतात. १५ दिवसांनी केलेल्या रोहयो कामाचे मोजमाप होते. त्यानुसार रोहयो मजूरांना मोबदला दिला जातो.[६] रोहयोचे काम हे मजूरांच्या संख्येनुसार किती दिवस चालणार हे समजते.

बी. एम. पोळ जलसंधारण विभाग वर्ग - १ चे अधिकारी यांनी रोहयोची अमंलबजावणीसंबंधी दिलेल्या माहितीनुसार, संबंधित विभागाच्या कामाची अमंलबजावणी करण्यापूर्वी संबंधित कामाचे स्थान निश्चीत करून मोजमाप घेतले जाते. त्यानंतर संबंधित गावातील गावकऱ्यांना ग्रामपंचायतीमार्फत काम केव्हा सुरू होणार हे सांगितले जाते. कामाची सुरूवात करण्यापूर्वी उदा. पाझर तलावाचे काम असल्यास गटाने किंवा गँगने काम दिले जाते. किती काम केल्यानंतर किती मजूरी याची माहिती संबंधित मजूरांच्या गटाला दिली जाते. १५ दिवसांनी कामाचे मोजमाप होते. त्यानुसार पगार वाटप केले जाते.

एस. एम. सुळ जलसंधारण विभाग वर्ग - २ चे अधिकारी यांनी, वरील वर्ग - १ च्या अधिकाऱ्यानुसार माहिती सांगितली. एक बाब विशेष सांगितली ती म्हणजे, संबंधित शेतकऱ्यांना शासकीय नियमाप्रमाणे भूसंपादन मोबदला दिला जातो. शेतकऱ्यांचे अडथळे रोहयो कामाची अमंलबजावणी करताना येतात.

रोहयो कामावरील मजूरांच्या समस्या व उपाय :-

रोहयोचे प्रत्यक्ष काम सुरू असताना मजूरांची गटागटांतील पगार वाटपासंबंधी, मोजमापासंबंधी तक्रार असल्यास त्या गटांना मजूरी कमी मिळण्याची कारणे समजावून सांगितली जातात. रोहयोचे कामावर गंभीर प्रकार घडल्यास उदा. एखाद्या मजूरांना जखम झाल्यास किंवा त्यास मृत्यू आल्यास वरिष्ठांना त्याबाबत ताबडतोब कळविले जाते. संबंधित मजूराला शासकीय नियमाप्रमाणे नुकसान भरपाई दिली जाते. रोहयो कामावरील मजूरांची पगार वाटप लवकर होण्यासंबंधी तक्रार असते. मजूरांना पगार वेळ का झाला नाही याची कारणे समजावून सांगितले जातात. साधारणपणे मजूरांचा पगार हा १५ ते २० दिवसांनी दिला जातो.

रोहयो कामांची अमंलबजावणी करताना येणाऱ्या समस्या :-

दुष्काळ परिस्थितीमध्ये प्रामुख्याने रोहयो कामाची अमंलबजावणी करताना अचानक रोहयो मजूरांची संख्या वाढते. त्यावेळी ओळखपत्र असणाऱ्या रोहयो मजूरांना प्रथम प्राधान्य दिले जाते. ज्यांनी रोहयोकामाची मागणी केली त्यांनी प्रथम कामावर घेतले जाते. त्यानंतर इतर रोहयो मजूरांचा विचार केला जातो. अमंलबजावणी करताना शेतकऱ्यांचा अडथळा येतो.

रोहयोची कुशल : अकुशल कामे :-

रोहयोचे काम हे विकासाकरिता आहेत पण त्याचा उद्देश मजूरांना अधिकाधिक रोजगार निर्माण करून देणे हा आहे. अकुशल ही कामे रोहयो मजूरांकडून केली जातात. कुशल कामासाठी कामाच्या स्वरूपानुसार ट्रॅक्टर, पाण्याचा टँकर, दगड ओढण्यासाठी ट्रॅक्टरचा वापर करावा लागतो. केलेले रोहयोचे काम मजबूत करण्यासाठी यंत्राचा वापर केला जातो. मात्र मानवी श्रमाने करतायेण्याजोगे काम आहे त्या कामाला मशीनचा वापर करता येत नाही.

रोहयो कामासंबंधी अमंलबजावणी अधिकाऱ्यांचे मत :-

रोजगार हमी योजनेसंबंधी कृषी अधिकारी व्ही. व्ही. कोळी यांच्या मते, रोहयो ही शेतकरी, शेतजमूरांसाठी फायदेशीर योजना आहे. कृषी विभागातील राबविलेल्या कामामुळे शेतकऱ्यांना शेततळ्यांद्वारे शेतातच पाणी साठवण्याची सोय होते. शेततळ्यात पाणी साठवून अनेक फळबागांना त्याचा फायदा झाल्याचा अनुभव आहे. कृषी विभागातील रोहयो कामामध्ये शेततळ्यांचे काम करण्यासाठी शेतकऱ्यांचे अनेक अर्ज येतात. रोजगार हमी योजनेच्या कामामुळे शेतकऱ्यांना पाणी साठवून ठेवण्याचे साधन निर्माण होते. तर शेतमजूरांना रोजगार मिळतो. त्यामुळे ही दोहोंसाठी वरदान ठरलेली योजना आहे. या कामामध्ये काही दोष वगैरे नसल्याचे सांगितले.

जलसंधारण विभागाचे तालुका स्तरावरील अधिकारी बी. एम. पोळ यांच्या मते, शेतकरी व शेतमजूरांसाठी ही योजना फायदेशीर आहे. जलसंधारण विभागातील कामामुळे भूजलपातळी वाढविण्यास मदत झाली आहे. भूजलपातळी वाढल्यामुळे शेतकऱ्यांच्या विहिरीच्या पाण्याची पातळी वाढते. पर्यायाने लागवडीखालील क्षेत्रही वाढलेले दिसते. या योजनेमुळे शेतमजूरांना रोजगार मिळतो. ह्या योजनेमुळे शेतकऱ्यांना

शेतमजूर मिळण्यास काही अडचण येत नाही. कारण शेतीच्या हंगामात रोहयोची कामे काढली जात नाहीत. दुष्काळाच्या काळात रोहयो काम सतत चालु असते. त्यावेळी शेतकऱ्यांना शेतमजूरांची गरज भासत नाही. अमंलबजावणी करताना काही समस्या निर्माण झाल्यास वरिष्ठांना कळविले जाते.

रोहयोच्या कामावर यंत्राचा वापर केला जात नसल्याचे सांगितले. गावातील लोकांना रोहयो कामामुळे पिण्याच्या पाण्याची सोय होते.

जलसंधारण विभाग अधिकारी एस. एम. सुळ यांच्या मते, रोजगार हमी योजनांचा दुष्काळी सांगोला तालुक्याला दुहेरी फायदा झाला आहे. रोजगार हमी योजनेमुळे शेतकरी, शेतमजूरांना जगण्याचे साधन मिळाले आहे. रोहयो कामावर स्त्रिया, मुले, पुरुष यांच्या काही समस्या असल्यास सोडविल्या जातात. रोजगार हमी योजनेवरील महत्वाची समस्या म्हणजे बहुसंख्य लोक निरक्षर व अशिक्षीत असतात. त्यांना एखादी गोष्ट समजावून देणे ही एक महत्वाची समस्या बनते. त्यांनी रोहयोमध्ये काही दोष वाटत नसल्याचे सांगितले. रोहयोच्या कामाच्या स्वरूपात परिस्थितीनुसार बदल करावेत असे त्यांचे मत आहे.

सांगोला तालुक्यात रोहयो अमंलबजावणी अधिकारी तहसिलदार डी. एन. माने यांचेकडून अमंलबजावणी संबंधी मिळालेली माहिती

रोहयोच्या कामाची मागणी :-

कोणत्या गावात रोहयो कामाची गरज आहे हे मागणीवरून समजते. गावातील ग्रामपंचायतीचे ग्रामसेवक किंवा तलाठी यांच्याकडे आलेल्या अर्जावरून रोहयोच्या कामाची मागणी समजते.

रोहयोच्या कामांना मंजूरी :-

रोहयोच्या कामाची मागणी किती आहे हे समजल्यानंतर तालुक्यातील रोहयो कामांची नीलप्रत बनविण्यात येते. ह्यासाठी तालुका रोहयो समितीची मान्यता घेण्यात येते. त्यानंतर मागण्या संकलीत करून जिल्हाधिकारी यांच्याकडे मंजूरीस जिल्हा रोहयो ऑफीसकडे नीलप्रत पाठविण्यात येते. जिल्हाधिकाऱ्यांनी त्या कामांना मंजूरी दिल्यास रोहयो कामांना मंजूरी मिळते.

रोहयो कामाची अमंलबजावणी :-

रोहयो कामांची अमंलबजावणी करताना तालुका स्तरावरील रोहयो समितीची त्या कामांना मंजूरी घेतली जाते. तालुका स्तरावरील रोहयो समितीची मान्यता मिळाल्यानंतर संबंधित खात्याला अमंलबजावणीचे आदेश दिले जातात. रोहयोमध्ये नेमून दिलेल्या पध्दतीनुसार काम चालते किंवा नाही हे पाहण्यासाठी तालुका स्तरावर निरीक्षण व दक्षता पथके काम करीत असतात. त्यावेळी रोहयोच्या अमंलबजावणी संबंधी अडीअडचणी समजावून घेऊन त्या दूर केल्या जातात.

सांगोला तालुक्यातील रोहयो कामांच्या अमंलबजावणी संबंधी समस्या :-

सांगोला तालुक्यात रोहयोची अमंलबजावणी करीत असताना शेतकऱ्यांना शेतमजूरांची कमतरता भासणार नाही हे लक्षात घेवूनच रोहयोची कामे चालु केली जातात. दुष्काळ किंवा टंचाई परिस्थितीच्या काळात रोहयो कामाची मागणी ही हंगामी कामापेक्षा जास्त असते. मागणी अचानक वाढल्यास रोहयोची तातडीची कामे मंजूर केली जातात. रोहयोच्या कामांना वरिष्ठ स्तरांवरून मंजूरी येताना काहीवेळा उशिर होतो. त्यावेळी रोहयो मजूर तालुका स्तरावरील रोहयो समिती व तद्संबंधी अधिकाऱ्यांना दोष ठरवितात हे योग्य नाही. रोहयोचे काम सुरू करताना काही शेतकरी अडथळा आणतात. रोहयो कामावरील सोई-सुविधा देताना कामाचे स्वरूप, कायद्यातील तरतुदी यानुसारच दिल्या जातात.

रोहयो कामावरील मजूरांना दिल्या जाणाऱ्या सोई-सुविधा :-

मजुरांच्या कामाची ठिकाणी पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करणे, त्यासाठी रोजंदारीवर मजूर लावणे. मजूरांना कामांच्या जागी विश्रांतीसाठी शेड बांधणे, परंतु यासाठी काम जास्त दिवस चालणाऱ्या ठिकाणी, मजूरांची संख्या १०० ते १५० पर्यंत असल्यास मजूरांना विश्रांतीसाठी शेडची बांधणी करणे. एखाद्या स्त्रीने प्रसूतीपूर्व वर्षभरात किमान सलग ७५ दिवस काम केलेले असल्यास प्रसूतीसाठी १५ दिवस रजा देण्यात येते. या रजेच्या काळात तिला त्या परिमंडळात देय असलेल्या दरानुसार मजूरीइतके सानुग्रह अनुदान देण्यात येते. स्त्रियांना मिळणाऱ्या सोयी-सुविधासंबंधी संबंधित स्त्रियांकडून कायदेशीर कागदपत्राची पूर्णता होत नसल्यामुळे त्यांना सोई-सुविधा मिळत नाहीत. याशिवाय लहान मुलांची संख्या जास्त असल्यास त्यासंबंधी मजूरांनी मागणी केल्यास, काम जास्त दिवस एकाच ठिकाणी चालणार असेल तर पाळणागृहाची व्यवस्था केली जाते.[७]

असे संबंधित अधिकाऱ्यांचे मत आहे.

रोहयो कामातील दोष :-

सांगोला तालुक्यातील रोजगार हमी योजनेचा अभ्यास करताना खालील प्रकारचे दोष लक्षात आले. या गावातील रोहयो मजूरांना निरक्षरतेमुळे त्यांच्या हक्काची व कामाची माहिती नसते. तसेच त्याबद्दल जाणीव जागृती ही झाली नाही हा मोठा दोष आहे. रोहयोमध्ये मजूरांच्या अज्ञानीपणाचा अमंलबजावणी कर्मचारी गैरफायदा घेताना दिसून येतात. रोजगार हमी योजनेत खोट्या हजेरी लावणे, न झालेल्या कामाची नोंद करणे असे प्रकार दिसून येतात. रोजगार हमी योजनेच्या मजुरीचा दर अतिशय कमी असल्यामुळे केवळ नाईलाजानेच लोक इकडे वळतात. रोहयो मजूरांना ज्या सोयी-सुविधा देण्याचा प्रयत्न होतो त्या सुविधा कागदोपत्रीच राहतात. काही ठिकाणी केलेल्या कामाचा दर्जा सुमार असल्याचे आढळून आले. काम करणाऱ्या लोकांना मजूरीही वेळेवर व पूर्ण मिळत नाही. प्रचंड पैसा कामगारांच्या पगारातून व्यवसाय कर रूपाने शासनाकडे जमा होऊन रोहयोवर खर्च होतो पण भ्रष्टाचाराने ही योजना इतकी ग्रासली आहे की त्यांच्या चौकशीसाठीच कायमचे वेगळे अधिकारी नेमले गेले आहेत. सोलापूर जिल्ह्यातील रोहयो भ्रष्टाचारावरून हे दिसून येते. रोहयोच्या केलेल्या कामाचे पुन्हा मुल्यमापन होत नाही. रोहयोची अपूर्ण कामे पूर्ण झाल्याचे दाखवून भ्रष्टाचार केला जातो. रोहयोच्या गैरव्यवहारामुळे रोहयोच्या मूळ उद्दीष्टांना तडा गेला आहे. रोहयो कामावर कामाच्या चुकीच्या नोंदी केल्या जातात. रोहयो कामावर स्त्री-पुरुष वेतनात भेद केला जातो. रोहयो कामावर दिला जाणारा मोबदला वेळेवर व योग्य पध्दतीने दिला जात नाही. शेतकऱ्यांना भूसंपादनाचा मोबदला योग्य वेळी, शासकीय नियमाप्रमाणे मिळत नाही. रोहयो नियमांची, सोयी-सुविधाची माहिती ही ग्रामसभेमध्ये देण्यात यावी. या प्रकारची माहिती दिली जात नाही. रोहयो कामाची सुरूवात करण्यास रोहयो नियमापेक्षा जास्त वेळ लावला जातो. दुष्काळ परिस्थितीमध्ये धान्य देताना भेदभाव केला जातो. गावात रोहयोचे काम सुरू झाले आहे हे वेळेवर समजत नाही. योग्यवेळी पुरेशा मागण्या करूनही रोहयोचे काम मिळत नाही. रोहयोची कामे कमी असल्यास वृध्दांना, स्त्रियांना कामावर घेण्यास टाळाटाळ केली जाते. रोहयोचे काम या परिस्थितीमध्ये गरिबांना न मिळता गावातील प्रभावी गटांनाच मिळते. रोहयो कामामध्ये अमंलबजावणी अधिकारी गरिब मजूर, स्त्रीमजूर यांना धमकावून दादागिरीची भाषा बोलतात. अमंलबजावणी अधिकारी रोहयोची अमंलबजावणी करताना कायदयाची भाषा वापरून वास्तविक समस्या जाणून देत नाहीत.[८]

BARR. BABASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR.

सोलापूर जिल्ह्यातील रोहयो भ्रष्टाचार व भ्रष्टाचाराचे प्रकार

सोलापूर जिल्हा हा एकमेव जिल्हा सर्वाधिक रोहयो कामे घेणारा जिल्हा असून दुष्काळ हा पाचवीला पुजलेल्या ह्या जिल्ह्यात रोजगार हमी योजनेवर दरवर्षी सुमारे तीनशे कोटी रुपये खर्च होतात. जुलै २००५ मध्ये सोलापूर जिल्ह्यात रोहयो कामामध्ये भ्रष्टाचार झाल्याचे उघडकीस आले आहे. यामध्ये सोलापूर रोहयो कार्यालयातील लिपिक गजानन निंबाळकर यांनी सोलापूर जिल्ह्यातील कृषी विभागाशी संबंधित रोहयोच्या कामांमध्ये पुराव्याच्या मूळ कागदपत्रांशिवाय केवळ झेरॉक्स प्रतीमधील जिल्हाधिकाऱ्यांच्या बनावट सह्या करून कृषी विभागाशी संबंधित रोहयोच्या कामांना मंजूरी आदेश काढून शासकीय निधीचा भ्रष्टाचार केल्याप्रकरणी लिपीक गजानन निंबाळकर यांना निलंबीत करण्यात आले. तत्कालीन सोलापूर जिल्हाधिकारी मनीषा वर्मा यांच्या सतर्कतेने रोहयोमधील भ्रष्टाचाराची प्रकरणे उघडकीस आली. या प्रकरणाची चौकशी केली असता, सोलापूर जिल्ह्यामधील अनेक रोहयो भ्रष्टाचाराची प्रकरणे उघडकीस आली आहेत. फळझाडे प्रत्यक्ष शेतात नसलेबाबत, नालाबंडिंगमधील पिचींगचे काम न करता खोट्या नोंदी करून अपहार, फळझाडे न लावता अपहार, रोहयो मजूरांचे खोटे अंगठे घेऊन रक्कम अपहार करणे, शेततळ्याचे यंत्राद्वारे कामे करून गैरव्यवहार, मोजमापात व मोजमाप पुस्तकात दर्शविलेल्या नोंदी वरून गैरव्यवहार इ. गैरव्यवहाराची २६ प्रकरणे सोलापूर जिल्ह्यात आढळून आली.[९]

सोलापूर जिल्ह्यातील सांगोला तालुक्यातील मौजे शिरभावी येथील गट क्र. २/२२ मध्ये शेततळ्याच्या कामाचे पंचनाम्याने घेतलेल्या मोजमापात व मोजमाप पुस्तकात दर्शविलेल्या मोजमापात तफावत आढळून आलेली आहे. तसेच सदर कामाचे प्रत्यक्ष घेतलेल्या मोजमापाप्रमाणे काम पूर्ण झालेली नसताना ही कामे पूर्ण झालेचे दाखवून हजेरी पुस्तकावर मजूरीचे वाटप केल्याचे दिसून आले. तथापि मजूरांनी त्यांना मजूरी मिळाली नसल्याचे लेखी जबाबात सांगितले. दिनांक २१ ऑगस्ट २००४ रोजी यासंबंधी कृषी पर्यवेक्षक सांगोला व कृषी सहाय्यक यांना निलंबीत करण्यात आले आहे.[१०]

सांगोला तालुक्यातील लोटेवाडी, कटफळ, इटकी या गावांतील रोहयो अभ्यासावरून व सोलापूर जिल्ह्यातील भ्रष्टाचार प्रकरणावरून रोहयो भ्रष्टाचाराचे प्रकार पुढीलप्रमाणे सांगता येतील.

जे काम जेसीबी यंत्राने केवळ एका दिवसात होते तेच काम मजूरांच्यामार्फत केल्यास एक महिना लागतो. पण मजूरांना काम आणि मोबदला मिळवून देण्यासाठी हेतूतःच शासनाने ही योजना आखल्यामुळे

त्यासंबंधी खर्च शासन करत असते. या परिस्थितीचा गैरफायदा उठविताना स्थानिक कंत्राटदारांनी राजकीय पुढाऱ्यांना हाताशी धरून एका दिवसात यंत्रानी काम करून महिनाभराचे वेतन हडप केले आहे. २००३-२००४ या कालावधीत दुष्काळाची जास्त तीव्रता असल्यामुळे सांगोला तालुक्यात शेततळ्याची अनेक काम जेसीबी यंत्राने केल्याचे आढळले. त्यानंतर ही रोहयो कामे तात्पुरती बंद करण्यात आली होती. याशिवाय मजूरांचे खोटे अंगठे, सह्या करून भ्रष्टाचार केला जातो. रोहयो मजूरांनी केलेल्या रोहयो कामातील मोजमापावरून भ्रष्टाचार होतो. यामध्ये मजूरांच्या अज्ञानीपणाचा फायदा घेतला जातो. रोहयो कामाच्या मोबदल्यात मिळणारे धान्य असूनही संपल्याचे सांगून भ्रष्टाचार होतो. रोहयोचे काम कमी असल्यास ते गावातील प्रभावी गटांना देणे. बोगस मस्टरद्वारे भ्रष्टाचार करणे. अपूर्ण कामे पूर्ण झाल्याचे दाखवून भ्रष्टाचार करणे. मजूरांना मिळणाऱ्या सोयी-सवलती प्रत्यक्ष न देता दिल्या असल्याची नोंद करून भ्रष्टाचार करणे या गोष्टींचा समावेश भ्रष्टाचार प्रकारात होतो.[११]

सांगोला तालुक्यातील रोजगार हमी योजनेच्या मांडणीचे निष्कर्ष

सांगोला तालुक्यातील रोजगार हमी योजनेच्या अभ्यासासाठी लोटेवाडी, कटफळ, इटकी या तीन गावांची निवड करण्यात आली. या अभ्यासावरून निष्कर्ष असा होतो की, ग्रामीण गरिबांच्या रोजगार आणि तदनुषंगिक गरजा भागविण्यासाठी रोहयो उपयुक्त आहे. रोहयो मजूरांना काम गावातच मिळते. रोहयोवरील मजूर हे निरक्षर असल्यामुळे रोहयो नियम, हक्कांची जाणीव नसते. मजुरांना मिळणाऱ्या सोई-सुविधा याविषयी जाणीव जागृती नाही. रोहयो कामावरील स्त्री-पुरुष मजूरांच्या मजूरीमध्ये फरक दिसतो.[१२] या गावातील स्त्री रोहयो मजूरांना मिळणाऱ्या सोई-सुविधा याविषयी जाणीव जागृती केली जात नाही. अधिकारी जे सांगतील तोच कायदा, नियम असल्याची त्यांची समजूत आहे. या गावातील शेतकऱ्यांनी रोहयोची कामे राबविल्यामुळे शेतीस फायदा झाला असल्याचे सांगितले. भूसंपादनाचा मोबदला देण्यास शासन दिरंगाई करते. रोहयोद्वारे टिकाऊ व उपयुक्त संसाधन निर्मितीही होत असते. रोहयो ही भूमिहिन, शेतकरी यांना उपयुक्त ठरल्याचे दिसते. सांगोला तालुक्यातील रोहयोच्या अभ्यासावरून असे लक्षात येते की, शेतमजूर व अमंलबजावणी प्रशासकीय अधिकारी यांच्या माहीतीमध्ये तफावत दिसून येते. वेतन मजूरी व वाटपातील दिरंगाई दिसून येते. याचा अभ्यास मुलाखतीद्वारे या गावातील शेतमजूर, सरपंच, शेतकरी सांगोला तालुक्याचे कृषी, जलसंधारण विभागाचे अधिकारी, तहसिलदार या अमंलबजावणी करणाऱ्या प्रशासकीय अधिकारी यांच्याकडून मुलाखत अनुसूचीद्वारे

माहिती मिळविली. रोहयोच्या कामामध्ये अमंलबजावणी संबंधी दोष असल्याचे दिसते. सांगोला तालुक्यातील रोजगार हमी योजनेला भ्रष्टाचाराचेही स्वरूप प्राप्त झाले आहे. रोजगार हमी योजना कायद्यातील सर्व तरतुदींची अमंलबजावणी होत नसल्याचे लक्षात येते. रोजगार हमी योजना छोटे सीमांत शेतकरी व शेतमजूरांना रोजगार मिळण्यासाठी महत्वाची योजना आहे. सांगोला तालुक्यासारख्या दुष्काळी भागाला ही योजना वरदान ठरल्याचे दिसून येते.[१३]

समारोप :-

सांगोला तालुक्यात रोजगार हमी योजनेची अमंलबजावणी कशाप्रकारे होते हे जाणून घेण्यासाठी सांगोला तालुक्यातील लोटेवाडी, कटफळ, इटकी या तीन गावांची निवड करण्यात आली असून लोटेवाडी, कटफळ आणि इटकी गावातील शेततळी, नालाबंडिंग, पाझरतलाव या कामावरील उपस्थित तीनशे मजूरांपैकी शंभर मजूरांच्या प्रश्नावलीच्या आधारे मुलाखती घेण्यात आल्या. या शंभर मजुरांमध्ये या गावातील सर्व समाजातील शेतमजूरांचा समावेश आहे. या गावातील गेल्या पाच वर्षात राबविण्यात आलेली विविध रोहयो कामाचा अभ्यास केला. या गावातील रोहयो कामावरील मजूरांचे शिक्षण, वयोगटानुसार वर्गीकरण यांचाही अभ्यास केला. रोहयो मजूरांच्या मुलाखती व निरीक्षणावरून रोहयो कामाची मागणी, ओळखपत्राची आवश्यकता, रोहयोच्या कामाचे स्वरूप, कामाचे मोजमाप, मोबदला, कामावर मिळणाऱ्या सोयी-सुविधा, स्त्रीयांच्या समस्या, रोहयो मजूरांच्या समस्या रोहयो कामावर मिळणारे वेतन, यंत्राचा वापर, बेकारभत्ता, दुष्काळ परिस्थितीमधील रोहयो कामाची अमंलबजावणी ह्यासंबंधी मते जाणून घेतली.[१४]

यावरून असे लक्षात येते, रोहयो कामावरील रोहयो मजूरांना त्यांच्या हक्कांची जाणीव कमी प्रमाणात आहे. रोहयो कामावरील मजूरांचे शिक्षणाचे प्रमाण खूपच कमी आहे. त्यामुळे रोहयो मजूरांना रोहयो कायदा, कामावर मिळणाऱ्या सोयी-सुविधा यांची माहिती नाही. या प्रकारची जाणीव जागृती केली जात नाही. या अभ्यासावरून असेही लक्षात येते की, रोहयो कायद्याची व्यवस्थितपणे अमंलबजावणी होत नाही.

या गावातील रोजगार हमी योजनेसंबंधी पंधरा शेतकऱ्यांची मते जाणून घेतली असता रोजगार हमी योजनेच्या विकासकामामुळे शेतीच्या पाणलोट क्षेत्रामध्ये वाढ होऊन भूजलपातळी वाढण्यास मदत झाली आहे. शेतीच्या कामासाठी शेतमजूरांची सुगीच्या कामाव्यतिरिक्त इतर वेळी कमतरता भासत नाही. भूसंपादनाचा मोबदला मिळण्यास विलंब होतो असे सांगितले. रोहयोची ही विकास कामे पडीक जमीनीतच करावीत अशी

शेतकऱ्यांची मागणी आहे.

रोहयो कामांची अमंलबजावणी करणाऱ्या सांगोला तालुक्यातील कृषी अधिकारी, जलसंधारण विभागाचे अधिकारी, तहसिलदार या प्रशासकीय रोहयो अमंलबजावणी अधिकाऱ्यांनी रोहयो कायद्यातील सर्वच्या सर्व तरतुदी प्रत्येक कामाच्या ठिकाणी राबविणे शक्य नसल्याचे सांगितले. कामाच्या परिस्थितीनुसार, कामाच्या स्वरूपानुसार निर्णय घ्यावेत लागतात असे त्यांचे नत आहे.

रोहयो कामाची अमंलबजावणी करण्यामध्ये प्रशासकीय अधिकारी उत्साही नाहीत. रोजगार हमी योजनेची कामे ज्या ठिकाणी कमी प्रमाणात असतात त्या ठिकाणी रोहयोचे काम हे वृध्द, गरिब व्यक्ती व स्त्रियांना मिळेल याची शाश्वती नसते. अमंलबजावणी करणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या मर्जीवरच काही ठिकाणी कामे चालू असल्याचे आढळते. रोजगार हमी योजनेच्या मूळ उद्दीष्टांना धरून कामे होत नाहीत. रोहयो कायदा आणि प्रत्यक्ष कामाची अमंलबजावणी यामध्ये फरक असल्याचे दिसते. रोजगार हमी योजना १९७२ पासून चालू झाली. त्यावेळच्या मागणीमध्ये व चालू स्थितीमधील रोहयो कामाच्या मागणी फरक असल्याचे दिसते. आज तरूणवर्ग रोहयोच्या कामावर फारसा दिसत नाही. आज रोहयो कामाच्या मागणीचे प्रमाण कमी आहे. रोजगार हमी योजनेच्या कामाच्या स्वरूपात बदल होऊ लागला आहे. रोजगार हमी योजनेच्या अमंलबजावणीमध्ये त्रुटी असल्यातरी सांगोला सारख्या दुष्काळी तालुक्यास आजही या योजनेचे महत्व असल्याचे दिसून येते.

संदर्भग्रंथ

१. सावळे संजय - ''मागेल त्याला काम रोजगार हमी योजना'', ग्रामीण गरिबांची अमृत योजना, वचनसंस्था नाशिक, पृ. १०-१२.

२. उपरोक्त, पृ. १४-१७.

३. उपरोक्त, पृ. २२-२३.

४. Patil Subhash - "EGS Prospects and Limitations" [24-30] Mam and Dvelopment, Volume XI, No. 3, 1989.

५. जाधव विशाल - ''मराठा अभिजनवर्गाचे हितसंबंध व रोहयोचे बदलते स्वरूप'', समाज प्रबोधन पत्रिका एप्रिल-जून २००६, पृ. १५०-१५६.

६. Chari Anurekha - Economic and political weekly, (p-5141-5147) 16 December, 2006.

७. रोजगार मही योजना समिती (२००५-२००६) विधानसभा पाचवा अहवाल महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय विधानभवन, मुंबई १८ जुलै २००६, पृ. २-५.

८. उपरोक्त, पृ. १०, ११, १३, १४.

९. दै. लोकसत्ता, ११ आक्टोबर २००५.

१०. दै. महाराष्ट्र टाईम्स, ४ फेब्रुवारी २००६.

११. रोजगार हमी योजना समिती (२००५-२००६) विधानसभा पाचवा अहवाल, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय विधानभवन, मुंबई १८ जुलै २००६. पृ. २६-२८.

१२. उपरोक्त, पृ. ३७-४०, ४३.

१३. सावळे संजय - ''नाशिक जिल्ह्यातील रोहयो व संपूर्ण ग्रामीण रोजगार योजनेची तुलना'', समाज प्रबोधन पत्रिका, जुलै-सप्टेंबर २००६, पृ. २८७-२९५.

१४. रोजगार हमी योजना समिती (२००५-२००६) विधानसभा पाचवा अहवाल महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय विधानभवन, मुंबई, पृ. ६-८.

मुलाखत :-

१. लोटेवाडी, कटफळ आणि इटकी गावातील शेतमजूर :- १५, १६, १७ एप्रिल २००६.

२. लोटेवाडी, कटफळ आणि इटकी गावातील शेतकरी :- १५, १६, १७, एप्रिल २००६.

३. लोटेवाडी, कटफळ आणि इटकी गावातील सरपंच :- २, ३, ४ मे २००६.

४. कृषी अधिकारी (सांगोला) व्ही. व्ही. कोळी :- ५ जून २००६.

५. जलसंधारण विभाग वर्ग - १ (सांगोला) बी. एम. पोळ :- १५ जून २००६.

६. जलसंधारण विभाग वर्ग - २ (सांगोला) एस. एम. सुळ :- १५ जून २००६.

७. सांगोला तहसिलदार (सांगोला) डी. एन. माने :- १५ जून २००६.